सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ११ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# राहुल म्हणाले- देश चालवणे मोदींच्या आवाक्यात नाही

## सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका यासारखी ७ आवाहने उपदेश नाहीत, अपयशाचे पुरावे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नवी दिल्ली**

राहुल गांधींनी सोमवारी पश्चिम आशियातील सध्याच्या संकटाचा सामना करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अलीकडील 'सात आवाहनांवर' पलटवार केला. त्यांनी याला अपयश म्हटले. ते म्हणाले की, आता देश चालवणे पंतप्रधानांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.

द वरील एका पोस्टमध्ये राहुल गांधींनी लिहिले, 'काल मोदीजींनी जनतेकडून त्याग मागितला. सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका, पेट्रोलचा वापर कमी करा, खत आणि खाद्यतेलाचा वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा, घरून काम करा. हे उपदेश नाहीत. हे अपयश आहे.'

ते म्हणाले, '१२ वर्षांत देशाला अशा टप्प्यावर आणले आहे की जनतेला सांगावे लागत आहे. काय खरेदी करावे, काय नाही.



कुठे जावे, कुठे नाही.' खरेतर, रविवारी सिकंदराबाद येथील एका जाहीर सभेत पंतप्रधान मोदींनी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या गरजेवर भर दिला होता, जेणेकरून परकीय चलनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.

**पंतप्रधान मोदींनी काय आवाहन केले?-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी इराण विरुद्ध अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर जनतेला काटकसर करण्याचे आवाहन केले. आपल्याकडे मोठ्या तेल विहिरी नाहीत. त्यामुळे सध्याच्या जागतिकि संकटाचा भारतावर अधिक परिणाम होत आहे. त्यामुळे आपण स्वयंपाकाचे तेल, पेट्रोल, डिझेल, गॅस आदींचा कमी वापर केला पाहिजे. यावर उपाय म्हणून ज्या शहरांत मेट्रो आहे, तेथील लोकांनी मेट्रोचा वापर करावा. बैठकांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व वर्क फ्रॉम होम सारख्या पर्यायांचा वापर करावा, असे ते म्हणाले.

# रिजेक्टेड माल, संपूर्ण देशाने राहुल गांधींना नाकारले आहे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे सांगितले, त्याचा अर्थच राहुल गांधी यांना समजला नाही. राहुल गांधी हे रिजेक्टेड माल आहेत. संपूर्ण देशाने राहुल गांधींना नाकारले आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर पलटवार केला. पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर, सोने खरेदी याबाबत केलेल्या आवाहनावर राहुल गांधी यांनी टीका केली होती. या टीकेचा खरपूस समाचार मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आताच्या घडीला ज्या प्रकारची जागतिक पातळीवर परिस्थिती तयार झाली आहे, त्याचा सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. आपल्या बाजूला असलेल्या पाकिस्तानात तर पेट्रोलचे भाव साडेचारशे रुपये इतके वर गेले आहेत. पेट्रोल डिझेल याची अनेक देशात कमतरता आहे. आपल्या भारतामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे पेट्रोल-डिझेल आणि गॅस या गोष्टी आपल्याला मिळत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे की, या गोष्टींचा अमर्याद वापर आपल्याला करता येणार नाही. पुरवठा साखळीची परिस्थिती पाहता आणि परकीय चलन



आपल्याला कसे वाचवता येईल, याकरिता पंतप्रधान मोदी यांनी केलेले आवाहन योग्य आहे. त्याला सर्वांनी प्रतिसाद द्यावा, अशी विनंती आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

राहुल गांधी यांनी केलेल्या टीकेवर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी जे सांगितले त्याचा जर अर्थ राहुल गांधी यांना कळला नाही, तर याचा दोष त्यांना देता येत नाही. कुठेतरी त्यांची समजच कमी आहे, पण तो अर्थ जनतेला कळला, जनता प्रतिसाद देईल. देशामध्ये सर्वांत रिजेक्टेड नेता, रिजेक्टेड माल म्हणून अख्ख्या देशाने त्यांना नाकारले आहे. त्यांना तुम्ही महत्व देता, आम्ही देत नाही, या शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी हल्लाबोल केला. तसेच काँग्रेसची अवस्था अशी आहे की, केंद्रीय नेतृत्वाला कोणी मानत नाही. केंद्रीय नेतृत्व निर्णय घेऊ शकत नाही. केंद्रीय नेतृत्व राज्याला सोबत घेऊन जाऊ शकत नाही. कर्नाटकात आपण पाहिले, तेच आता केरळमध्ये होणार आहे, अशी टीका फडणवीस यांनी केली.

# सुषमा अंधारे हक्कभंग समितीसमोर हजर

## कुणाल कामराचा व्हिडिओ शेअर करणे पडले महागात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई-** सुषमा अंधारे विधान भवनात हक्कभंग समितीसमोर हजार झाल्या आहेत. कालच रुपाली चाकणकर यांना त्यांनी चौकशीला सामोरे जावे लागल्याने टोला लगावला होता. आता आज अंधारे यांनाही चौकशीला सामोरे जावे लागले आहे. समितीसमोर सुषमा अंधारे यांची बाजू मांडणार आहेत. स्टँडअप कमेडियन कुणाल कामराने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणे सादर केले होते व त्याला सुषमा अंधारे यांनी पाठिंबा देत त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. या



प्रकरणी अंधारे यांच्यावर हक्कभंगाची कारवाईची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आज त्या चौकशी समितीसमोर हजर झाल्या असल्याचे समजते. स्टँडअप कमेडियन कुणाल कामराने आपल्या एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एक विडंबन काव्य सादर केले होते. त्यात त्याने एकनाथ शिंदे यांना उद्देशून 'गद्दार' शब्दाचाही उल्लेख केला होता. कुणाल कामराचा हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला होता. अनेकांनी हा व्हिडिओ शेअर केला होता. त्यात सुषमा अंधारे यांनी देखील त्याचा व्हिडिओ शेअर करत शिवसेना शिंदे गटाला डिवचले होते. त्यानंतर कामरा आणि अंधारे यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या पूर्वी सुषमा अंधारे यांनी प्रकृतीचे कारण पुढे करत चौकशीला सामोरे जाण्यास टाळले होते. मात्र आज दुपारी २ वाजता त्या विधान भवनात हक्कभंग समितीसमोर हजर झाल्या असून आपली साक्ष नोंदवणार आहेत. तसेच सुषमा अंधारे त्यांच्या भूमिकेवर ठाम असल्याचेही समजत आहे.

# निदा खान इम्तियाज जलील यांची नातेवाईक

## संजय शिरसाटांचा थेट आरोप, मुख्यमंत्र्यांना पत्र; १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांवरील अत्याचार आणि सक्तीच्या धर्मांतराच्या आरोपांमुळे राज्यभरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या निदा खानला छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आल्यानंतर आता या प्रकरणाला राजकीय रंग चढताना दिसत आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकरणावर भाष्य करत गंभीर आरोप केले आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा सूत्रधार माजी खासदार इम्तियाज जलील असल्याचा थेट दावा त्यांनी केला असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना निदा खान ही केवळ सामान्य आरोपी नसून ती 'पेड वर्कर' असल्याचा आरोप केला. त्यांच्या मते, या प्रकरणामागे संघटित पद्धतीने काम केले गेले असून आरोपींना राजकीय पातळीवरून मदत मिळाल्याचा संशय आहे. शिरसाट यांनी असा दावा केला की, एमआयएमच्या एका नगरसेवकाने निदा खानला लपण्यासाठी आसरा दिला होता. ज्या घरात ती राहत होती ते घरही अनधिकृत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्या जागेवर लवकरच कारवाई होऊ शकते,



असे संकेतही त्यांनी दिले. या आरोपांमुळे प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे.

याचवेळी संजय शिरसाट यांनी निदा खान आणि इम्तियाज जलील यांच्यातील नातेसंबंधांबाबतही मोठा दावा केला. निदा खान ही इम्तियाज जलील यांच्या भावाच्या पत्नीची नातेवाईक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणात जलील यांचा थेट संबंध असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर, यासंदर्भात आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रही लिहिल्याची माहिती त्यांनी दिली. आता या गंभीर आरोपांवर इम्तियाज जलील काय भूमिका घेणार आणि त्यांचे उत्तर काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

**मतीन पटेल यांचे नगरसेवक पदही धोक्यात - महापौर**

निदा खान हिला आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीने मतीन पटेल यांच्या नारेगाव परिसरातील त्यांचे दुसरे निवासस्थान आणि कार्यालयालाही नोटीस देण्यात आली आहे. महापौर समीर राजूरकर यांनी या प्रकरणावर भाष्य करत मतीन पटेल यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले.

# देशहितासाठी 'कान्स' दौरा रद्द अन् बैठका ऑनलाइन होणार

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनानंतर मंत्री आशिष शेलार यांचे तीन निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई-** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, याचे सावट आता भारतावरही दिसू लागले आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आपल्या विभागासाठी तीन महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत.

मंत्री आशिष शेलार यांनी मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना सांगितले की, देशासमोरील आर्थिक आणि इंधन संकट पाहता आमच्या विभागाने तातडीने काही पावले उचलली आहेत. जागतिक चित्रपट महोत्सवासाठी (उरपपशी) विभागाकडून कोणाही प्रतिनिधीने जाऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. विभागाच्या कामकाजासाठी इंधनावरील वाहने टाळून केवळ इलेक्ट्रिक वाहनांचा (एत) वापर केला जाईल. उद्यापासून माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक विभागाच्या सर्व बैठका प्रत्यक्ष न होता ऑनलाइन स्वरूपात पार पडतील, जेणेकरून प्रवासावरील इंधन खर्च वाचवता येईल.

**देशहितासाठी हे पाऊल उचलणे गरजेचे-** या निर्णयांची माहिती देताना



आशिष शेलार म्हणाले की, सध्याची जागतिक युद्धाची परिस्थिती पाहता पुरवठा साखळीवर मोठा ताण आहे. अशा वेळी आयातीवर मर्यादा घालणे आणि भारतीय रुपयाचे मूल्य संतुलित ठेवणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. आपल्याला वैयक्तिक जीवनातही काही बंधने घालून घ्यावी लागतील. बाहेर फिरण्याचे प्रमाण कमी करावे लागेल. देश हे आपले कुटुंब असून देशहितासाठी हे पाऊल उचलणे गरजेचे आहे.

**राहुल गांधींच्या टीकेला प्रत्युत्तर**

पंतप्रधानांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्यासोबतच वर्षभर सोने खरेदी न करण्याचे जे आवाहन केले, त्यावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी ही टीका केली की, 'हे मोदींचे अपयश आहे'. या टीकेचा आशिष शेलार यांनी कडाडून समाचार घेतला. राहुल गांधींचे विधान हे त्यांच्या अज्ञानाचा पुरावा आहे. देश प्रगती करत असताना त्यांना केवळ पोटदुखी होत आहे. जागतिक संकटाच्या काळात देशहितासाठी केलेल्या आवाहनावर राजकारण करणे दुर्दैवी आहे, असा टोला शेलार यांनी लगावला.

# हायकोर्टाच्या अवमान प्रकरणात वाशिम मुख्याधिकाऱ्यांना नोटीस

## स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नागपूर**

मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने एका आदेशाच्या अवमान प्रकरणामध्ये वाशिम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी नीलेश गायकवाड यांना नोटीस बजावून येत्या ८ जूनपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकरणावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली.

उच्च न्यायालयाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी रवींद्र सरनाईक यांची याचिका निकाली काढताना शिट क्र. ३६ - भूखंड क्र. ६३ येथील बांधकाम नियमित करण्याच्या मागणीवर आठ आठवड्यांत नियमांनुसार निर्णय घेण्याचा आदेश मुख्याधिकाऱ्यांना दिला होता. त्या आदेशाचे निर्धारित मुदतीत पालन करण्यात आले नाही.

त्यामुळे सरनाईक यांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी स्मरणपत्र दिले. परंतु, मुख्याधिकाऱ्यांनी त्याचीही दखल घेतली नाही. परिणामी, सरनाईक यांनी उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल



करून मुख्याधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे. सरनाईक गेल्या अनेक वर्षांपासून हक्कांसाठी भांडत आहेत. परंतु, प्रशासकीय उदासीनतेमुळे त्यांच्या पदरी सतत निराशा पडत आहे. त्यांनी बांधकाम नियमित करण्यासाठी नगरपरिषदेला आतापर्यंत चारदा प्रस्ताव दिले आहेत. पहिल्यांदा २७ सप्टेंबर २०२१ रोजी प्रस्ताव दिला होता. त्यावेळी त्यांना गुंठेवारी भूखंडावरील बांधकामे नियमित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर नवीन प्रस्ताव देण्यास सांगण्यात आले होते. ती प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्यांनी नवीन प्रस्ताव दिला, पण त्यावर जाणीवपूर्वक निर्णय घेणे टाळले जात आहे. नगरपरिषदेने समान स्वरूपाचे इतर प्रस्ताव मात्र मंजूर केले आहेत, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यातर्फे ड. संतोष चांडे यांनी बाजू मांडली.



## संपादकीय ......


# सोमनाथ : अखंड श्रद्धेचे महापर्व

*सोमनाथ मंदिर हे केवळ श्रद्धास्थान नसून भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थान, स्वाभिमान आणि अखंड जिद्दीचे प्रतीक आहे. २०२६ मधील 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हजार वर्षांच्या संघर्ष, पुनर्बांधणी आणि राष्ट्रीय आत्मविश्वासाच्या इतिहासाला नव्या पिढीसमोर अभिमानाने उभे करत आहे.सोमनाथ मंदिर भारतातील केवळ एक प्राचीन मंदिर नसून, भारताच्या अभेद्य संस्कृतीचे आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. अरबी समुद्राच्या किनार्यावर उभे असलेले हे ज्योतिर्लिंग केवळ श्रद्धेचे केंद्र नाही; तर आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान, राज्यकारभार आणि राष्ट्रीय पुनर्जागरण असा इतिहास आणि वर्तमान आहे. २०२६ मध्ये आपण साजरे करीत असलेले सोमनाथ स्वाभिमान पर्व हे या प्रवासाला नव्या पिढीसमोर आत्मविश्वासाने, अभिमानाने आणि संतुलित भावनेने मांडणारा वळणबिंदू आहे.१०२६ मध्ये गझनीने सोमनाथवर सर्वप्रथम आक्रमण केले. हे आक्रमण धर्मयुद्ध तर होतेच; पण ती व्यापारमार्ग आणि सोमनाथमध्ये असलेल्या संपत्तीवर लक्ष केंद्रित करणारी आक्रमक कारवाई सुद्धा होती. गुजरातच्या गीर सोमनाथ जिल्ह्याच्या वेरावलजवळील त्या काळी पश्चिम किनारपट्टीवरील महत्त्वाचे बंदर होते, प्रभास पाटण. येथेच सोमनाथ मंदिर होते जे त्या संपूर्ण किनारी अर्थव्यवस्थेचे आणि स्थानिक राजसत्तेचे प्रतीक होते. हे मंदिर फोडणे म्हणजे संपूर्ण व्यवस्था नष्ट करणे होते. औरंगजेबाच्या १७०६ च्या आदेशानंतर, सोमनाथवर अनेक वेळा आक्रमण करण्यात आले, मूर्ती फोडल्या गेल्या; पण एवढे होऊनही सोमनाथ यात्रेचा मार्ग नष्ट झाला नाही आणि त्यावरील श्रद्धाही कमी झाली नाही. सोमनाथावर झालेल्या प्रत्येक आक्रमणानंतर स्थानिक समाज, व्यापारी, साधू-संत, नंतर मराठा व पुढे स्वातंत्र्योत्तर नेतृत्व, कोणी ना कोणी नव्याने उभे राहिले आणि सोमनाथाचे संरक्षण केले. त्यामुळे सोमनाथचा इतिहास केवळ पीडित इतिहास नाही, तर तो प्रतिकार आणि पुनरुत्थान दोन्हींचा एकत्रित इतिहास आहे.सोमनाथ आणि महाराष्ट्राचे नाते भूगोलाने नव्हे, तर इतिहासाने जोडलेले आहे. अलाउद्दीन खिलजीसारखे आक्रमक गुजरातकडे सरकले आणि सौराष्ट्र-सोमनाथवर हल्ले करणे त्यांच्यासाठी सोपे झाले. महाराष्ट्रातील राजनीतिक स्थैर्य कोसळले की पश्चिम किनार्याला धोका वाढतो, हा पहिला ऐतिहासिक धडा येथेच दिसून आला. शिवरायांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य, नंतर छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या संघर्षातून टिकून राहिले. पुढे पेशवाईच्या काळात या स्वराज्याने दक्षिण ओलांडून उत्तर-पश्चिम भारतापर्यंत पाय रोवले. मराठा फौजा कृष्णा-गोदावरी पार करत गुजरातकडे गेल्या आणि काही दशकांतच काठियावाड परिसरातील मोगल सामर्थ्य जवळजवळ निष्प्रभ झाले. या बदलत्या शक्तिसंतुलनात सोमनाथ पुन्हा भारतीय राजसत्तेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आले.स्वातंत्र्यानंतर भारताने हा सर्व इतिहास लक्षात घेऊन काम करणे सुरू केले. जुनागढ भारतात समाविष्ट झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ पुनर्बांधणीचा संकल्प घेतला. हा संकल्प केवळ धार्मिक नव्हता, तर राष्ट्रीय स्वाभिमानाचा होता. पंडित नेहरू, महात्मा गांधी यांचा मात्र याबाबत वेगळा दृष्टिकोन होता. राज्याने थेट मंदिराशी ओळख जोडू नये, धर्मनिरपेक्ष चौकट राखावी, हा त्यांचा आग्रह होता. के. एम. मुन्शी आणि सरदार पटेल यांनी मात्र भारतीय राज्य धर्मनिरपेक्ष राहील; पण जुन्या स्मृती कायम ठेऊन, असे स्पष्ट केले होते. १९५१ मध्ये उभे राहिलेले आधुनिक सोमनाथ मंदिर हा त्याचाच परिपाक होते.२०२६ मध्ये सोमनाथ स्वाभिमान पर्वाने याला नवा अर्थ दिला आहे. गझनीच्या महमूदच्या पहिल्या आक्रमणाला एक हजार वर्षे पूर्ण होत असताना, देशाने हा प्रसंग अखंड श्रद्धेचा महापर्व म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. गुजरात सरकार, केंद्र सरकार, अनेक सांस्कृतिक संस्था, साधू-संत, विद्वान, आणि सर्वसामान्य भक्त यांच्या सहभागातून हे स्वाभिमान पर्व आकाराला आले. ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम, अखंड मंत्रजप, व्याख्यानमाला, प्रदर्शने आणि यात्रांमधून एकच संदेश दिला गेला आणि तो म्हणजे भारताला कोणीही कितीही वेळा तोडण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा आत्मा टिकून राहतो. या पर्वानिमित्त देशभरातून यात्रेचे कार्यक्रम आणि दिल्लीपासून निघालेली स्वाभिमान यात्रा हेच दर्शवते की, सोमनाथ फक्त गुजरातचा विषय नसून, तो अखिल भारताचा विषय आहे. वेगाने शहरी होत असलेल्या, डिजिटल पिढीच्या युवकांसाठी हे स्वाभिमान पर्व जणू इतिहासाची जाणीव वर्गात नव्हे, प्रत्यक्ष स्थळी अशी भूमिका निभावत आहे.*

*या सर्व प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग आणि नेतृत्व विशेष उल्लेखनीय आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी १०-११ जानेवारीला सोमनाथ येथे जाऊन या पर्वात थेट सहभाग घेतला, कार्यक्रमांना संबोधित केले, स्वाभिमान आणि अखंड श्रद्धा या संकल्पनांना वर्तमान भारताच्या संदर्भात जोडून मांडले. त्यांच्या भाषणांतून आणि उपस्थितीतून एक महत्त्वाचा संदेश गेला आणि तो म्हणजे-सांस्कृतिक स्मृतीचा सन्मान करणे म्हणजे कोणाविरुद्ध द्वेष बाळगणे नाही, उलट, स्वविश्वासाने उभ्या असलेल्या भारताचेच हे लक्षण आहे. म्हणूनच, या पर्वाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करणे म्हणजे एका सरकारचा नव्हे, तर एका दृष्टिकोनाचा गौरव करणे आहे, इतिहासाकडे कमीपणाच्या भावनेने नव्हे, तर आत्मविश्वासाने पाहावा असा दृष्टिकोन यामागे आहे.सोमनाथ स्वाभिमान पर्वाने आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून दिली की, इतिहास हे फक्त हिशेब-मांडणारे पुस्तक नाही; तो राष्ट्राचा सामूहिक मानस आहे. या मानसाचे स्वरूप काय असावे, याचे उत्तर आपल्यासमोर स्पष्ट आहे. जखमा विसरायच्या नाहीत; पण त्यावरच अडकलो तर भविष्य घडत नाही. पुनर्बांधणीची, पुनरुत्थानाची संस्कृती जिवंत ठेवायची असेल, तर सोमनाथची कथा सतत सांगितली गेली पाहिजे. महमूदपासून आणि औरंगजेबापासून, अहिल्याबाई आणि गायकवाडांपासून, पटेल-मुन्शी ते थेट आजच्या नेतृत्वापर्यंत. सोमनाथच्या घंटानादात आजही एकच ध्वनी घुमतो आणि तो म्हणजे आक्रमण होऊ शकतात, सत्ताबदल होऊ शकतात, वाद होऊ शकतात; पण जो समाज आपल्या स्मृतीचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा धागा तुटू देत नाही, त्याला इतिहास संपवू शकत नाही. २०२६ चे स्वाभिमान पर्व ही त्या अढळ सत्याची, हजार वर्षे चाललेल्या भारतीय जिद्दीची घोषणा आहे. आणि भारताच्या नेतृत्वाने ती जाणीवपूर्वक, सन्मानाने आणि उत्तरदायित्वाने देशासमोर मांडली, यासाठी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन करावेच लागेल.*

# बहिण-भावासह चौघांचा तलावात बुडून मृत्यू





**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

पोहण्यासाठी गेलेल्या चौघांचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घातखेडा शेत शिवारात घडली. मृतांमध्ये दोन मुली, दोन मुलांचा समावेश आहे. सोनाली नरेंद्र जोशी (१६), आदित्य नरेंद्र जोशी (१२), पायल बबलू पंडित (२१), यश गजानन काकणे (१३) सर्व खोलापुरी गेट यांचा समावेश आहे. यातील सोनाली व आदित्य हे बहिण-असलेल्या घातखेडा येथील तलाव परिसरात गेले होते. यावेळी तलावात पोहण्याचा मोह झाल्याने या चिमुकल्यांनी पाण्यात उडी घेतली. मात्र, यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने त्यातील एक जण पाण्यात बुडू लागला. हे बघून

## घातखेडा परिसरातील घटना

अन्य एकाने त्याला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतली. त्यानंतर एकमेकांना वाचविण्याच्या प्रयत्नात चौघेही पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा बचाव पथक आणि फ्रेजरपुरा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी युद्ध पातळीवर शोध मोहीम राबविली. काही वेळातच चौघांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. याघटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये दोन सख्खे बहिण भाऊ आहेत. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून चौघांचे मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.

### अन् पायाखालची जमीनच सरकली..!

नरेंद्र जोशी यांनी स्वतः ऑटोत बसवून आपल्या आदित्य आणि सोनालीसह ११ मुलांनी तलाव परीसरात नेवून सोडले होते. मुलांनी त्यांना आम्ही खेळतो... तुम्ही येथे बसून काय करणार ? आमचे झालेकी, फोनकरतो.. असे सांगून नरेंद्रयांनाघराकडे परत पाठविले.... ! पण, तोच या चिमुकल्यांचा अखेरचा निरोप ठरला... ! कारण, नियतीच्या मनात वेगळेच काहीतरी दडले होते. सायंकाळी ४ ते ४.३० वाजता...एकदम धक्कादायक बातमी कळताच जोशी कुटुंबियांसह इतर पालकांच्या पायाखालची जमीनच सरकली...

# दर्यापुरात १३ मे रोजी हुंकार स्त्री शक्तीचा जाहीर सभा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११अमरावती**

सकल हिंदू समाज, दर्यापूर व गोपाल पाटील अरबट मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हुंकार स्त्री शक्तीचा या जाहीर प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. लव्ह जिहाद, छुपे धर्मांतर व महिला सुरक्षा या विषयांवर ही सभा होणार असून प्रखर हिंदुत्ववादी वक्त्या काजल हिंदुस्थानी दीदी (गुजरात) प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.ही सभा बुधवार, १३ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता कन्या शाळेच्या मैदानावर, बस स्थानकासमोर, दर्यापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. दर्यापूरच्या इतिहासात प्रथमच मोठ्या संख्येने माता-भगिनी एकत्र येऊन लव्ह जिहादपासून लेकीचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त करणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.या सामाजिक व राष्ट्रीय विषयाला प्रसिद्धी द्यावी तसेच वार्तांकनासाठी प्रतिनिधी पाठवावेत, असे आवाहन श्री. गोपाल पाटील अरबट यांनी केले आहे. पत्रकारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील धरणांमधील जलसाठ्यात कमालीची घट

## पाणी टंचाईचे सावट/बाष्पीभवनाचा परिणाम, ४४.९६ टक्के जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अमरावती**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून तापमानात कमालीची वाढ झाली आहे. पारा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचला. त्यामुळे उन्हाची तीव्रता आणखी वाढली. परिणामी जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. आजघडीला संपूर्ण प्रकल्पामध्ये ४४. ९६ टक्के जलसाठा शिल्लक आहे. तसेच यातील २२ च्या वर लघु प्रकल्प पूर्णतः कोरडे पडले आहेत. त्यामुळे या



प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तसेच येत्या काळात प्रकल्पांची पाणी पातळी आणखी खाली गेल्यास तीव्र पाणीटंचाईची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न निर्माण होईल.

गतवर्षी पावसाळ्यात जोरदार पावसाने हजेरी लावली. परतीचा पाऊसही चांगला झाला. त्यामुळे जिल्ह्यातील धरण, तलावांमध्ये मुबलक जलसाठा उपलब्ध झाला होता. मात्र, सध्या राज्यासह जिल्ह्यातकाही दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. मध्यंतरी ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाने वातावरणात बदल झाला होता. मात्र,पुन्हा उन्हाची तीव्रता वाढत चालली आहे. उन्हाचा तडाका जाणवू लागल्याने त्याचा परिणाम हा पाण्याच्या पातळीवर होत आहे. यावेळी होणाऱ्या बाष्पीभवामुळे पाणीसाठी कमी होत चाललेला आहे. परिणामी जिल्ह्यातील अनेक प्रकल्प कोरडे पडले असून काहींचा जलसाठा खोलवर गेला आहे. जिल्ह्यात ५६ प्रकल्पांमध्ये ४४.९६ टक्के जलसाठा आहे. तसेच सात मध्यम प्रकल्पात ४२.५५ टक्के जलसाठा आहे. यातील एक गर्गा प्रकल्प हा पूर्णता कोरडा पडला आहे. याशिवात ४८ लघु प्रकल्पांमध्ये ३७.५६ टक्केच पाणीसाठा आहे. यामध्ये २२ प्रकल्प कोरडे पडले आहेत. त्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

# अमरावती जिल्ह्यातील तलावांवर सुरक्षा उपाययोजना करा -प्रवीण हरमकर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती** अमरावती जिल्ह्यातील विविध तलाव, बंधारे व खोल पाण्याच्या ठिकाणी वारंवार घडणाऱ्या बुडून मृत्यूच्या घटनांमुळे चिंता व्यक्त करत शिवसेना शहर प्रमुख तथा माजी विरोधी पक्षनेते प्रवीण वसंतराव हरमकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.अलीकडच्या काळात पोहण्यासाठी किंवा फिरण्यासाठी गेलेल्या लहान मुलांसह अनेक तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अशा धोकादायक ठिकाणी सूचना फलक नसणे, पाण्याची खोली दर्शविणारी व्यवस्था नसणे तसेच आपत्कालीन साधनांचा अभाव ही प्रमुख कारणे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.हरमकर यांनी जिल्ह्यातील सर्व तलाव, नदीघाट व जलाशय परिसरात खोल पाणी - धोका, पोहण्यास सक्त मनाई, प्रवेश निषिद्ध अशा सूचना मराठी भाषेत मोठ्या अक्षरात लावण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. तसेच पाण्याच्या खोलीची माहिती देणारे खांब बसविणे, धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स उभारणे, दोरखंड, लाईफ जॅकेट, टायर ट्यूब व प्रथमोपचार पेटी उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.यासोबतच प्रमुख पर्यटनस्थळी स्थानिक स्वयंसेवक अथवा जीवरक्षक नेमून नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी तसेच शाळा, महाविद्यालये व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.ही उपाययोजना तातडीने राबविल्यास भविष्यातील अपघाती मृत्यू टाळता येतील व अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्यापासून वाचतील, असे हरमकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

## मद्यधुंद बस चालकाचा थरार

# दोन दुचाकींना धडक देऊन स्टाफ बस घातली खड्ड्यात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११नांदगाव खंडेश्वर** - यवतमाळ मार्गावरील इखार ढाब्याजवळ रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास एका खासगी कंपनीच्या स्टाफ बसने दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. त्यानंतर ही बसही उलटली. या भीषण अपघातात दोन दुचाकीस्वार आणि बस चालक असे तिघे जण जखमी झाले आहेत. बस चालक मद्याच्या नशेत असल्यानेच हा अपघात झाल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी केला आहे. सुलतानपूर येथे 'नागार्जुन कन्स्ट्रक्शन कंपनी' चा कॅम्प आहे. या कंपनीतील कर्मचाऱ्यांना नांदगाव येथे सोडून स्टाफ बस परत कॅम्पकडे जात होती. इखार ढाब्याजवळ आली असता, भरधाव असलेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि बसने समोरून येणाऱ्या दोन दुचाकींना धडक दिली. धडक दिल्यानंतर बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन उलटली.अपघातावेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तात्काळ धाव घेऊन जखमींना बस आणि दुचाकीखालून बाहेर काढले व उपचारासाठी रुग्णालयात हलविले. यावेळी बस चालक पूर्णपणे दारूच्या नशेत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. मद्यधुंद अवस्थेत बस चालवून निष्पाप लोकांचा जीव धोक्यात घातल्यामुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.घटनेची माहिती मिळताच नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याचे ठाणेदार लांबाडे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवत वाहतूक सुरळीत केली. पोलीस याप्रकरणाचा अधिक तपास करत असून, चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# आईचे प्रेम व ममता...! पोटच्या मुलीला किडनी देऊन दिला पुनर्जन्म..

## डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी किडनी प्रत्यारोपण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, येथे आईने आपल्या मुलीच्या प्रेमापोटी किडनी दान करून मुलीला दिला पुनर्जन्म. डॉ पंजाबराव वैद्यकीय महाविद्यालयात नुकतेच एक किडनी प्रत्यारोपण यशस्वी पूर्ण झाले. अकोला जिल्ह्यातील बाळापुर स्थित वास्तव्यात असणारे ३८ वर्षी अनुश्री विनोद गोळे यांना गेल्या सहा महिन्यापासून बीपी वाढणे, श्वास भरून येणे, अशा सारखा त्रास होत असताना, स्थानिक पातळीवर तपासणी केली असता, अनुश्रीच्या दोन्ही किडन्या बरोबर काम करीत नाही. अशा परिस्थितीत त्यांनी अकोला येथे खाजगी मध्ये उपचार सुरू केले. डॉ नी त्यांना किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांनी नागपूर येथील किंग्सवे हॉस्पिटल येथे धाव घेतली. परंतु प्रत्यारोपणाची तयारी करीत असताना होणारा खर्च त्यांना झेपणारा नव्हता व नागपूर त्यांच्याकरिता त्रासदायक होत असल्यामुळे त्यांनी डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांच्याशी संपर्क साधून माहिती करून घेतली. अनुश्रीची आई पथ्रोट येथे राहणारी उषा साहेबराव महल्ले, वयाने सत्तरीच्या घरात असताना देखील मुलीच्या प्रेमापोटी किडनी दान देण्यास तयार झाली व पुढील प्रक्रिया पूर्ण करून समाजापुढे पुन्हा एका आईने आपल्या अपत्याप्रति असलेले प्रेम ,त्याग व ममता सिद्ध केले व समाजाला अवयवदानाचा यातून संदेश दिला. नेफ्रोलॉंजीस्ट डॉ हितेश गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार घेत असताना, किडनी प्रत्यारोपणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ, यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजीष्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर, डॉ राहुल घुले, डॉ प्रतीक चिरडे, डॉ आचल सिंगल, नेफ्रॉलॉजीष्ट डॉ हितेश गुल्हाने, बधिरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ स्वप्निल नागे, डॉ रोहित



रुग्ण :- अनुश्री गोळे | डोनर :- उषा महल्ले

हातगावकर, डॉ किरण हिरूळकर, डॉ रिकेश म्हात्रे, डॉ ऋतुजा परिहार, डॉ शिवलीला मेनकुंद्धे, यांचा मोलाचा वाटा होता. पाच ते सहा तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. रुग्ण व नातेवाईकांचे समुपदेशन, पोलीस वेरिफिकेशन, कायदेशीर बाबीची पूर्तता या सर्व बाबी पूर्ण करून प्राधिकरण समिती समोर सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रियेला मान्यता मिळवून घेणे. यात ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांची महत्त्वाची भूमिका होती.प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ अमोल नरोटे ,प्रतिनिधी उपसंचालक आरोग्यसेवा अकोला, डॉ विनोद पवार सिविल सर्जन, डॉ अविनाश लव्हाळे, सेवानिवृत्त उपसंचालक, डॉ पवन टेकाडे, डॉ रामअवतार सोनी, डॉ शुभांगी वर्मा, डॉ किशोर बनसोड यांनी रुग्ण , डोनर व नातेवाईक यांची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व पडताळणी करून शस्त्रक्रिये करीता मान्यता दिली. शस्त्रक्रिया दरम्यान ओटीमध्ये परिचारिका संध्या वाघमारे, प्रियंका मैद, सुमित्रा घाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, राणी खेकडे, आशिष बोकडे ,वैभव नासरे ,प्रतीक्षा भिसेकर, अरविना जांभेकर, रोशन मेश्राम यांनी काम पाहिले. व पुढील दहा दिवस किडनी अति दक्षता विभागात शितल अंबरते, दामिनी ढवळे शशिकांत ढिवर, नेहा घोरपडे, श्रेया धांडे, प्रतीक्षा दामोदर, काजल गुर्जर, ममता चव्हाण, ममता इरतकर, वैष्णवी मरसकोले, जतीन दडमल हे कार्यरत राहणार आहे. रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, मेट्रन चित्रा देशमुख ,एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहायक आरती मोरांडे यांची शस्त्रक्रिया पूर्व तयारीत मोलाचे सहकार्य होते. ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्व देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालय स्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला. कुटुंबीय सदस्यांनी शस्त्रक्रिया बाबत समाधान व्यक्त केले. सध्या रुग्ण व डोनर ,किडनी आयसीयू मध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत असून प्रकृती स्थिर आहे . गोपाल सावरकर, मधुर भुयार, उमेश सोनवणे ,उमेश चव्हाण, मंगेश गुलधे, वर्षा गाढवे, प्रशांत खडसे, आकाश हंबर्डे, निलेश धोंगळे यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# अमरावती जिल्हा परिषदेत बदली सत्र सुरू

## चार विभागांतील ३८ कर्मचाऱ्यांचे स्थानांतर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती:** जिल्हा परिषदेतील सर्वसाधारण बदली प्रक्रियेला रविवारी सुरुवात झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सत्रात चार विभागांतील ३८ कर्मचाऱ्यांचे स्थानांतर करण्यात आले. ही प्रक्रिया समुपदेशन पद्धतीने अत्यंत पारदर्शक वातावरणात पूर्ण झाली. आरोग्य विभागातील उर्वरित कर्मचाऱ्यांच्या बदल्या सोमवारी केल्या जाणार आहेत. बदली सत्रासाठी जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात समुपदेशन आयोजित करण्यात आले होते. सकाळी १० वाजता सुरू झालेली प्रक्रिया दुपारी थांबली. जनगणना सेवा नसलेल्या विविध विभागांतील वर्ग-क कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय, विनंती आणि आपसी बदल्यांचा यात समावेश होता. पहिल्या दिवशी महिला व बालविकास, कृषी, पशुसंवर्धन आणि वित्त व लेखा विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. महिला व बालविकास विभागात अंगणवाडी पर्यवेक्षिका पदाच्या ४ विनंती बदल्या झाल्या. पशुसंवर्धन विभागात सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदाच्या २ प्रशासकीय आणि १ विनंती बदली, तर पशुधन पर्यवेक्षक पदासाठी २ प्रशासकीय व ४ विनंती बदल्या करण्यात आल्या. दुसऱ्या

### आरोग्य विभागाचा टप्पा बाकी



टप्प्यात वित्त व लेखा विभागातील कनिष्ठ सहाय्यक लेखा पदाच्या १ प्रशासकीय व १ विनंती बदली झाली. तसेच, वरिष्ठ सहाय्यक लेखा पदाच्या २ प्रशासकीय, २ विनंती आणि १ आपसी विनंती बदली करण्यात आली. आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदाच्या १ प्रशासकीय व २ विनंती बदल्या, तर आरोग्य सेवक (पुरुष) पदाच्या ८ प्रशासकीय आणि ७ विनंती बदल्या झाल्या. आरोग्य विभागातील उर्वरित कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया सोमवारी पार पडणार आहे. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) श्रीराम कुलकर्णी, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी शिल्पा पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) विलास मरसाळे, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे उपआयुक्त डॉ. संजय कावरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, जिल्हा कृषी अधिकारी मल्ला तोडकर आदी अधिकारी उपस्थित होते. सहाय्यक प्रशासन अधिकारी निलेश तालन, कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्रीकांत मेश्राम व पंकज गुल्हाने यांच्यासह हेमंतकुमार यावले, सुजित गावंडे, सतीश पवार, राहुल रायबोले आणि निशांत तायडे यांनी बदली प्रक्रियेचे कामकाज यशस्वीरित्या सांभाळले.

# ४२,६८० जागांसाठी आजपासून जिल्ह्यात ११ वी प्रवेश प्रक्रिया सुरु

## पहिली यादी १४ मे रोजी, १९ पासून इनहाऊस कोटा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–**
दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता अकरावी प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. जिल्ह्यात एकूण ३३९ महाविद्यालयांमध्ये सुमारे ४२,६८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.



आज सोमवार, ११ मे पासून अकरावी प्रवेशाची ऑनलाईन प्रक्रिया सुरू होत आहे, ज्याला 'टप्पा दोन' असे नाव देण्यात आले आहे. या टप्प्यात विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या निवडीचा पसंतीक्रम नोंदवता येणार आहे.

दहावीचा निकाल दोन दिवसांपूर्वी घोषित झाला असून, अमरावती जिल्ह्यातील ३४,२०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांच्या अकरावी प्रवेशाचे अर्ज शाळांनी यापूर्वीच भरून घेतले होते, ज्याला 'पहिला टप्पा' म्हटले गेले.

आता सोमवारपासून प्रवेशाचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. काही विद्यार्थी आयटीआय आणि तंत्रनिकेतनकडे वळण्याची शक्यता असल्याने अकरावीच्या काही जागा रिक्त राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

मात्र, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लगेच परीक्षा घेतली जात असल्याने त्यापैकी काही विद्यार्थी आणि गतवर्षी प्रवेश न घेऊ शकलेले काही विद्यार्थी यांच्यामुळे या रिक्त जागा भरून निघतील, असे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या टप्प्यानंतर १४ मे रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. या यादीत कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही अभ्यासक्रमांसाठी पसंती दर्शवलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश असेल. अमरावती जिल्ह्यात विज्ञान शाखेच्या सर्वाधिक १८,३२० जागा आहेत, त्याखालोखाल कला शाखेच्या १८,२६० आणि वाणिज्य अभ्यासक्रमाच्या ६,१०० जागा आहेत.

इनहाऊस कोटा (ज्या शाळेत विद्यार्थी शिकला, त्याच शाळेच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मागणारे विद्यार्थी), अल्पसंख्याक आणि व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया १९ मे पासून सुरू होईल. त्यानंतर, २१ आणि २२ मे रोजी उर्वरित विद्यार्थ्यांना कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त १० महाविद्यालयांचा पर्याय द्यावा लागणार आहे.

या पर्यायांनुसार पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी २६ मे रोजी जाहीर केली जाईल. यादी जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना तीन दिवसांत प्रवेश घ्यावा लागेल. गरजेनुसार आणखी काही टप्पे वाढवले जातील, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# दस्तूर नगर ते समृद्धी महामार्ग जोडणाऱ्या ८४० कोटींच्या रस्त्याची आ. रवि राणा यांच्याकडून पाहणी

## हा रस्ता परिसराच्या आर्थिक, औद्योगिक आणि कृषी विकासाला देणार नवी गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** :शहर व परिसराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या दस्तूर नगर ते समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या सुमारे ८४० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पाची आमदार रवी राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह पाहणी केली. या प्रकल्पामुळे अमरावती शहरासह ग्रामीण भागातील दळणवळण अधिक गतिमान होणार असून औद्योगिक, कृषी आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.अमरावती शहरातील दस्तूर नगर चौकातून सुरू होणारा हा प्रस्तावित मार्ग हनुमान गडी, भानखेड, लालखेड, मालखेड, वडगाव जिरे, मांजरी, खिरसाना, निरसाना, सावरेन, मोखड आणि नांदगाव खंडेश्वर या महत्त्वाच्या गावांमधून जात थेट समृद्धी महामार्गाला जाऊन मिळणार आहे. विशेष म्हणजे लालखेड परिसरातील अंबुजा सिमेंट - अदानी प्रकल्पालाही या मार्गाचा मोठा फायदा होणार आहे.पाहणीदरम्यान आमदार रवि राणा यांनी अधिकाऱ्यांना



कामाच्या गुणवत्तेबाबत विशेष सूचना दिल्या. रस्त्याचे काम नियोजनबद्ध आणि वेळेत पूर्ण करण्यासोबतच स्थानिक नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन भविष्यातील वाहतुकीचा विचार करून सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले.यावेळी बोलताना रवि राणा म्हणाले की, समृद्धी महामार्गाला जोडणारा हा रस्ता केवळ वाहतुकीचा मार्ग नसून संपूर्ण परिसराच्या आर्थिक, औद्योगिक आणि कृषी विकासाला चालना देणारा प्रगतीचा महामार्ग ठरणार आहे. या प्रकल्पामुळे गुंतवणूक वाढेल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल.या प्रकल्पाला शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महाराजस्व अभियान शेवटच्या माणसा पर्यंत पोहचवा :-सौ प्राप्ती मारोटकर

## नांदगावात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नांदगाव खंडेश्वर**
छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान हे जनतेच्या समस्यांचा निपटारा तात्काळ करणारे असून सर्व सामान्य माणसा पर्यंत पोहोचले पाहिजे असे प्रतिपादन नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर यांनी महसूल विभागाच्या वतीने आयोजित महाराजस्व अभियानात बोलताना व्यक्त केले नागरिकांच्या समस्या एकाचवेळी एकाच ठिकाणी सोडविण्यात याव्या याकरीता राज्य सरकार व महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत असून नांदगाव येथील स्थानिक तहसील कार्यालयात नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर यांच्या हस्ते




उदघाटन करण्यात आले महाराजस्व अभियानाच्या निमित्ताने नवीन राशन कार्ड सात बारा दुरुस्ती उत्पन्न दाखला पी आर कार्ड कोतवाल बुक नक्कल इत्यादी प्रमाणपत्र वाटप व इतरही समस्यांचे निराकरण यावेळी करण्यात आले यावेळी नायब तहसीलदार देशपांडे, राठोड,मुजमुले,उपअधीक्षक नागरगोजे उपनगराध्यक्ष मो जमीर नगरसेवक वासुदेव लोखंडे मो प्रकाश मारोटकर मो साजिद शेख हारून इत्यादी उपस्थित होते तहसील कार्यालय कृषी विभाग भूमी अभिलेख शिक्षण विभाग सामाजिक वनीकरण विभाग आरोग्य विभाग नगर पंचायत विभाग वीज वितरण कंपनी सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते या राजस्व अभियानाच्या यशस्वीते करिता मंडळ अधिकारी परिहार तलाठी गोरे मेश्राम राठोड कुंभलकर अमोल दारव्हाटकर कोतवाल इत्यादींनि परिश्रम घेतले.-

# नेरपिंगळाईत नोझल चोरट्यांचा धुमाकूळ

## शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीला जबाबदार कोण?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ नेरपिंगळाई**
नेरपिंगळाई गावात सध्या शेतकऱ्यांच्या शेतातील स्पिंकलरचे पितळी नोझल व केबल चोरीच्या घटनांनी शेतकरी वर्गात प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावात नोकरदार वर्ग कमी असून बहुतांश नागरिक शेतीवर उदरनिर्वाह करतात. आधीच निसर्गाचा लहरीपणा, वाढते उत्पादन खर्च आणि कर्जाचा डोंगर यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला असताना आता चोरीच्या घटनांनी त्यांची चिंता आणखी वाढवली आहे.शेतकरी मोठ्या कष्टाने कर्ज काढून किंवा उसनवारी करून शेतीची मशागत करतात. ज्यांच्याकडे पाण्याची व्यवस्था आहे ते गहू, चणा यांसारख्या



पिकांची लागवड करतात. या पिकांसाठी स्पिंकलर संच, पितळी नोझल आणि केबल यांची आवश्यकता असते. मात्र शेतकरी रात्री पाणी देऊन घरी परतताच काही भामटे शेतात शिरून महागडे नोझल आणि केबल चोरी करून नेत असल्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. पराग संभे, शीतल घाटे, अरुण पाटुरकर, रणजीत काकस यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून हजारो रुपयांचे साहित्य चोरीला गेले आहे. काहींनी पोलिसांत तक्रार दिली, तर काहींनी काहीच होणार नाही या भावनेतून तक्रार करण्याचेही टाळले. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढत असल्याची चर्चा गावात सुरू आहे.गावात प्रश्न उपस्थित केला जात आहे की, या चोरट्यांना कुणाचा आशीर्वाद आहे का? कारण वारंवार चोरी होऊनही आरोपी सापडत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणाऱ्या या टोळ्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे.संबंधित पोलिस प्रशासनाने या घटनांची गंभीर दखल घेऊन चोरट्यांचा तत्काळ शोध घ्यावा व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी नेरपिंगळाई परिसरातील शेतकरी करत आहेत.

### बच्चू कडू यांच्या उपस्थितीमध्ये

# प्रहार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक

## शिवसेना पक्षाची विस्तारा संदर्भात चर्चा..



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक तथा विधान परीषदेचे आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत अमरावती विभागातील प्रहारचे प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी आणि संपर्कप्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष, संपर्कप्रमुख, तालुकास्तरीय पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी राजकीय आणि सामाजिक वाटचालीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत शिवसेना पक्षाची संघटनात्मक बांधणी आणी प्रहार संघटनेच्या सामाजिक कार्याचा विस्तार आणि शिवसेना संघटना मजबूत करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. ज्या लोकांना राजकीय क्षेत्रामध्ये काम करायचे ते शिवसेना पक्ष प्रवेश करणार ज्यांना सामाजिक काम करायचे ते प्रहार मध्ये काम करणार असं ठरलं आहे-

# मेडिकल कॉलेज अमरावती शहरातच हवे; अचलपूरला हलविण्यास नागरिकांचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** : अमरावती शहरातील कोंडेश्वर रोडवरील वडद परिसरात प्रस्तावित शासकीय मेडिकल कॉलेज उभारण्यास मंजुरी मिळाल्यानंतर आता या कॉलेजच्या ठिकाणावरून राजकीय आणि सामाजिक स्तरावर वाद निर्माण झाला आहे. आमदार बच्चू कडू आणि आमदार प्रवीण तायडे यांनी हे मेडिकल कॉलेज अचलपूर येथे व्हावे, अशी मागणी पुढे आणली असली तरी अमरावती शहरातील नागरिकांनी मात्र या मागणीला तीव्र विरोध दर्शविला आहे. मेडिकल कॉलेज हे अमरावती शहराच्या मुख्यालयात आणि सर्वसामान्यांना सहज पोहोचता येईल अशा मध्यवर्ती भागातच उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, मेडिकल कॉलेज हे केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून त्यासोबत मोठे रुग्णालय, आपत्कालीन सेवा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, संशोधन सुविधा आणि आरोग्यसेवेचे केंद्र निर्माण होते. त्यामुळे जिल्हाभरातून येणाऱ्या रुग्णांना आणि विद्यार्थ्यांना सहज पोहोचता येईल अशा ठिकाणी मेडिकल कॉलेज असणे आवश्यक आहे. अचलपूर हे अमरावतीपासून अंतरावर असल्याने ग्रामीण भागातील तसेच शहरातील रुग्णांना मोठा प्रवास करावा लागेल. यामुळे वेळ, पैसा आणि उपचारांमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.अनेक सामाजिक संघटना आणि नागरिकांनी स्पष्ट केले की, मेडिकल कॉलेज शहराच्या मध्यवर्ती भागात झाल्यास वाहतूक, निवास, बाजारपेठ, औषध दुकाने आणि इतर आवश्यक सुविधा सहज



उपलब्ध होतील. तसेच शहराच्या विकासालाही मोठी चालना मिळेल. वडद परिसरात मंजूर झालेल्या जागेऐवजी अधिक सोयीस्कर आणि सर्वांना पोहोचण्यास सुलभ अशा ठिकाणाचा विचार शासनाने करावा, अशी मागणीही पुढे येत आहे.दरम्यान, या विषयावर राजकीय वातावरणही तापू लागले असून मेडिकल कॉलेजच्या जागेबाबत अंतिम निर्णय घेताना जनतेच्या भावना आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. मेडिकल कॉलेज अमरावती शहरातच व्हावे, अचलपूरला हलवू नये, अशी ठाम भूमिका आता सर्वसामान्य नागरिकांकडून मांडली जात आहे.

जीएमसी अमरावतीतच होणार -पालकमंत्री बावनकुळे पासपोर्ट अमरावती मेडिकल कॉलेजच्या स्थानावरून सध्या वाद सुरू आहे. आमदार रवी राणा, आमदार संजय खोडके, आमदार बच्चू कडू आणि आमदार प्रवीण तायडे या चार आमदारांची मागणी आहे की, मेडिकल कॉलेजत्यांच्या मतदारसंघात व्हावे. या पार्श्वभूमीवर बावनकुळे म्हणाले की, जिल्हा रुग्णालय जिल्ह्यातच असणे आवश्यक असल्याचे सांगत, अचलपूरमध्ये स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत सरकार सकारात्मक विचार करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अचलपूर परिसरात टाटा इन्स्टिट्यूट आणि लता मंगेशकर हॉस्पिटलसारख्या संस्था कार्यरत असून, मेळघाट भागातही शासकीय रुग्णालयाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मेळघाट आणि अचलपूरलाही चांगले रुग्णालय असले पाहिजे असे म्हटले. काही सामाजिक संस्थांशीही या संदर्भात बोलणी सुरू आहेत. मेडिकल हॉस्पिटल अमरावतीसाठी मंजूर झाले आहे. जागा मागे-पुढे करता येईल, पण अमरावती मुख्यालयाचे हॉस्पिटल दुसरीकडे वळवण्याऐवजीअचलपूरला काही नवीन पर्याय काढता येईल का, या उद्देशाने चर्चा चालू आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### पैशांच्या वादातून मध्यरात्री राडा !

# शुक्रवार बाजार परिसरात तरुणाचा चाकूने भोसकून खून

## पोलिसांनी अवघ्या काही तासांतच दोन्ही आरोपींना अटक



आरोपी मृतक आरोपी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

पैशांच्या शहरात देवाणघेवाणीच्या वादातून एका तरुणाची निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. फेजरपुरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शुक्रवार बाजार परिसरात रविवारी मध्यरात्री हे हत्याकांड घडले. मात्र, घटनेचे गांभीर्य ओळखून गुन्हे शाखेने अत्यंत वेगाने तपास करत अवघ्या काही तासांतच दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, सय्यद नाझीम सय्यद सालार (रा. शुक्रवार बाजार) हा रविवारी रात्री १० मे मृतक-रोजी आपल्या चुलत भावासोबत आणि मित्रासोबत परिसरात फिरत होता. मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास नाझीमचा निशांत भोवते नामक व्यक्तीशी फोनवर पैशांच्या व्यवहारावरून वाद झाला. नाझीम त्याला भेटण्यासाठी मदीना मांडा सेंटर जवळील गल्लीत गेला असता,

नाजीम तिथे आधीच दबा धरून बसलेल्या निशांत भोवते आणि त्याचा मित्र यशराज कोरी यांनी नाझीमवर चाकूने सपासप वार के ले. नाझीमच्या गळ्यावर, ओठावर आणि कपाळावर गंभीर वार झाल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. आरडाओरडा झाल्यामुळे आरोपींनी तिथून पळ काढला. जखमी नाझीमला तातडीने इर्विन रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषितकेले.

या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा ॲक्शन मोडमध्ये आली. गुन्हे शाखाप्रमुख संदीप चव्हाण व त्यांच्या पथकाने तांत्रिक माहिती आणि खबर्यांच्या आधारे आरोपींचा माग काढला. ११ मे रोजी पहाटेच्या सुमारास सापळा रचून निशांत भोवते आणि यशराज कोरी या दोन्ही मुख्य आरोपींना अटक करण्यात आली. शेख तौसीफ यांच्या जबानी रिपोर्टवरून पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# तिवसा तहसीलवर शेतकऱ्यांचा एल्गार

## हरभरा-तूर खरेदी आणि पीक विम्यासाठी शेतकरी आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तिवसा :**

२२एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे प्रशासनाची अनास्था अशा दुहेरी संकटात सापडलेल्या तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांचा संयम अखेर सुटला आहे. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा होणाऱ्या उद्रेकाला प्रशासन जबाबदार असेल, अशा शब्दांत शेतकऱ्यांनी तहसील प्रशासनाला धारेवर धरले. नाफेडची खरेदी आणि पीक विम्याच्या मुद्द्यावरून आज तिवसा तहसील कार्यालयात आक्रमक निवेदन सादर करण्यात आले.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने हरभरा खरेदीसाठी २९ मे आणि तूर खरेदीसाठी ३१ मे पर्यंत मुदतवाढ दिली असताना तिवसा तालुक्यातील खरेदी केंद्र का बंद आहेत? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. खरेदी-विक्री मॅनेजर दीपक गोफने यांनी बारदाना नाही



असे तकलादू कारण पुढे करून २० दिवस खरेदी बंद ठेवली. यामुळे हजारो शेतकऱ्यांचा शेतमाल उघड्यावर असून, या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खऱ्या शेतकऱ्यांचा माल घरात पडून असताना, चक्क ४०० बनावट ऑनलाइन नोंदणी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता असून, या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी तिवसा नगरपंचायतचे विरोधी पक्षनेते अनिल थुल, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, अजय आमले, मनोज काळमेघ, योगेश गोर्हे, बाळा देशमुख, प्रकाश चिचखेडे, स्वप्नील तुरकाने, अनिल मेश्राम, विजय ठाकरे, निशू वानखडे, किशोर सातपुते, प्रवीण डहाके, ऋषी देशमुख, अतुल चितारे, नितीन मेहकरे, शिवानंद शापामोहन, गणेश डोळस, प्रदीप बाभुळकर, रोशन खोब्रागडे, संतोष मोरे, कुणाल जुमळे, पंकज लांडगे, गजू शेंदरे, राहुल मकेश्वर , विलास हांडे, जानराव मनोहर, मनोज खाकसे, मनीष माहोरे, प्रफुल मकेश्वर यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

तालुक्यातील हजारो शेतकरी अद्यापही हरभरा, तूर खरेदीपासून वंचित आहे. बारदाना नसल्याने २० दिवस खरेदी बंद ठेवणाऱ्या व्यवस्थापक गोफणेवर निलंबनाची कारवाई झाली पाहिजे. तर तातडीने शेतकऱ्यांची तूर, हरभरा खरेदी तातडीने सुरू करावी, खरिपाचा विमा शेतकऱ्यांना तातडीने देण्यात यावा. अन्यथा येत्या काळात शेतकऱ्यांचे आंदोलन अधिक तीव्र होईल.

**- प्रशांत कांबळे,**
सामाजिक कार्यकर्ते

### पीक विम्यासाठी विमा कंपन्यांची कुंभकर्णी झोप

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे जमिनी खरडून गेल्या, पिकांचे अतोनात नुकसान झाले. शेतकऱ्यांनी हप्ते भरले, पण विमा कंपन्या मात्र हात वर करत आहेत. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणे थांबवा आणि तात्काळ विम्याची रक्कम खात्यात जमा करा, असा इशारा यावेळी देण्यात आला.


हे केवळ निवेदन नाही, तर हा अंतिम इशारा आहे. जर येत्या काही दिवसांत खरेदी सुरू झाली नाही आणि विम्याचा प्रश्न सुटला नाही, तर तिवसा तालुक्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकरी पुत्र रस्त्यावर उतरला तर तो आपला हक्क घेतल्याशिवाय शांत बसणार नाही

**- अनिल रामचंद्र थुल (शेतकरी, तिवसा)**

### हायवे एसपी यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली

# कोट्यवधींच्या अवैध गुटखा रॅकेटवर मोठी कारवाई

## अमरावती-बडनेरा मार्गावर ट्रक जप्त, मोठ्या आर्थिक साखळीचा तपास सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

अमरावती-बडनेरा मार्गावरून कारंजाकडे भरधाव वेगाने जात असलेला अवैध गुटख्याने भरलेला ट्रक हायवे एसपी यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पेट्रोलिंगदरम्यान पकडण्यात आला. या कारवाईमुळे अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या मोठ्या अवैध गुटखा तस्करी रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या गुटख्याची किंमत कोट्यवधी रुपयांमध्ये असल्याचे सांगितले जात आहे. ट्रकमध्ये विविध नामांकित कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा मोठ्या प्रमाणात भरलेला होता. या कारवाईनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.या अवैध व्यवसायामागील मुख्य सूत्रधार कोण, याचा शोध घेण्यासाठी पोलिस तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाने सखोल तपास सुरू केला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणातील गुटखा तस्करीमागे मोठे आर्थिक जाळे आणि काही प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग असल्याची चर्चा रंगू लागली आहे.या रॅकेटचे धागेदोरे अमरावती शहराशी जोडलेले आहेत का, तसेच यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास आता निर्णायक टप्प्यात पोहोचत असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती कारंजा पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला यांनी दिली.या मोठ्या कारवाईनंतर अवैध गुटखा माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून येत्या काही दिवसांत या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.-

### बच्चू कडू यांच्या वक्तव्यावर बावनकुळे यांची प्रतिक्रिया

# महायुतीच्या बैठकीत आमदारांनी काय बोलावे, हे स्पष्ट करण्यात आले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**

आमदार बच्चू कडू यांनी नुकतेच एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत, तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असे विधान करून राज्याच्या राजकारणात चर्चेला उधाण आणले होते. त्यांच्या या वक्तव्यावर आता जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.बावनकुळे म्हणाले की, महायुतीच्या समन्वयक समितीच्या बैठकीत सर्व आमदारांनी सार्वजनिकरीत्या कोणती भूमिका मांडावी आणि कोणत्या विषयांवर भाष्य करावे, याबाबत स्पष्ट सूचना देण्यात



आल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही नेत्याने अथवा आमदाराने आपली वैयक्तिक भूमिका मांडण्यापूर्वी आपल्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, महायुती ही एकत्रितपणे काम करणारी आघाडी असून सर्व घटक पक्षांनी समन्वय राखणे गरजेचे आहे. माध्यमांसमोर व्यक्त होणारी मते ही महायुतीच्या धोरणाशी सुसंगत असावीत, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे बच्चू कडू यांनीही आपल्या पक्षाच्या नेतृत्वाशी बोलूनच भूमिका घ्यावी, असा अप्रत्यक्ष सल्लाच बावनकुळे यांनी दिला.दरम्यान, बच्चू कडू यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले असून, शिंदे समर्थक आणि इतर नेत्यांमध्येही चर्चांना वेग आला आहे. महायुतीतील समन्वय आणि नेतृत्वाच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

# लाल मिरचीचा बसतोय ठसका; किलो तीनशे पार!

## अमरावतीच्या बाजारपेठेततिखटाची आग : गृहिणींचे बजेट कोलमडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती-** जिल्ह्यात सध्या कडाक्याच्या उन्हाचा तडाखा सुरू असतानाच, आता स्वयंपाकघरातील लाल मिरचीनेही सर्वसामान्यांना ठसका दिला आहे. बाजारात लाल मिरचीचे दर गगनाला भिडले असून, एक किलो मिरची चक्क ३०० रुपयांच्या पार पोहोचली आहे. उन्हाळ्यात वर्षभराचे तिखट साठवून ठेवण्याच्या कामाला वेग येत असतानाच वाढलेल्या या दरांमुळे गृहिणींचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे.

जिल्ह्यात उन्हाळा सुरू झाला की प्रत्येक घरात वर्षभरासाठी लागणारे तिखट, मसाला तयार करण्याची लगबग सुरू होते. या



काळात मिरचीला मोठी मागणी असते. मात्र, यंदा मिरचीच्या उत्पादनावर झालेला परिणाम आणि वाढलेली मागणी यामुळे बाजारपेठेत दरांचा भडका उडाला आहे. सध्या बाजारपेठेत चांगल्या दर्जाची मिरची ३०० रुपये प्रति किलो दराने विक्री होत आहे.

### खड्या मसाल्याचेही दर वाढले

मिरचीसोबतच इतर खड्या मसाल्यांचे दरही वधारले आहेत. तिखट कुटून देणाऱ्या गिरण्यांसमोर सध्या गर्दी असली, तरी मिरची खरेदी करताना ग्राहक आता हात आखडता घेत असल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मिरचीच्या दरात मोठी वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरवर्षी आम्ही उन्हाळ्यात ५-१० किलो मिरची घेऊन तिखट तयार करतो. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दर खूपच वाढले आहेत. एक किलो ३५० रुपयांना मिळत असेल, तर इतर मसाल्यांचा खर्च मिळून तिखट खूप महाग पडत आहे. गृहिणींना घर चालवताना अडचण जात आहे. **मृणाली कडू गृहिणी.**

# दोषी तहसीलदारांना तात्काळ बडतर्फ करा; अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावर युवक काँग्रेसचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

मोर्शी व वरुड तालुक्यातील सिलींग, भुदान, पायलट स्किम तसेच नियमबाह्य कुळ योजनेअंतर्गत शेतीसाठी वाटप करण्यात आलेल्या जमिनींच्या सत्ता प्रकारात नियमबाह्य बदल करून शासनाचे सुमारे १० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप युवक काँग्रेसने केला आहे. या प्रकरणी तत्कालीन तहसीलदारांवर कायमस्वरूपी बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.युवक काँग्रेसच्या निवेदनानुसार, भोगवटा वर्ग २ मधील जमिनींचा भोगवटा वर्ग १ असा सत्ता प्रकार परावर्तित



करण्याचे अधिकार नसताना तत्कालीन तहसीलदारांनी मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात तत्कालीन तहसीलदार किशोर गावंडे, गजेंद्र मालठाणे, नंदकिशोर घोडेस्वार, पंकज चव्हाण, रविंद्र चव्हाण, राहुल पाटील, चारुदत्त पाटील, सागर ढवळे आणि विनोद वानखडे यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.उपविभागीय अधिकारी मोर्शी प्रदीपकुमार पवार यांनी ३० जुलै २०२५ व ४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन स्वतंत्र अहवाल सादर करून संबंधित तहसीलदारांनी गंभीर अनियमितता केल्याचे नमूद केले होते. तसेच उपजिल्हाधिकारी महसूल यांनीही हा अहवाल कायम ठेवत पुढील कारवाईसाठी सादर केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.मात्र, वर्ष उलटूनही दोषींवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने युवक काँग्रेसने संताप व्यक्त केला आहे. येत्या सात दिवसांत दोषी अधिकाऱ्यांच्या बडतर्फीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावेळी प्रामुख्याने अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष अनिकेत ढेंगळे,संतोष टिंगणे, वैभव देशमुख, आशिष यादव, शुभम बाबल,पवन ढोबळे, हरशल साखरकर, चेतन राऊत, विकी यादव यांच्यासह युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी जाणार संपावर

## १४ मे पासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासह राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या १४ मे २०२६ पासून टप्प्याटप्प्याने राज्यव्यापी आंदोलन करण्याचा अधिकृत इशारा समितीने प्रशासनाला दिला आहे. याबाबत आज विद्यापीठातील अधिसभागृहात व्दार सभा संपन्न झाली. संयुक्त कृती समितीचे समन्वयक तथा महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री अजय दशमुख यांनी यांनी सभेला संबोधित केले. यावेळी महासचिव श्री नरेंद्र घाटोळ, विद्यापीठ ऑफिसर्स फोरमचे उपाध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, सचिव डॉ. विलास नांदुरकर व विभागीय कार्याध्यक्ष श्री ज्ञानेश्वर बारस्कर उपस्थित होते.विद्यापीठ



व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना न्यायोचित मागण्या अनेक वर्षापासून शासनस्तरवर प्रलंबित आहे. त्यामध्ये सातवा वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांनंतर देय असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करण्यात यावी. राज्य सार्वजनिक विद्यापीठांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी करण्यात यावी. सन २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन सन २००५ नंतर नियुक्ती प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देय असलेले रजा रोखीकरण सातव्या वेतन आयोगानुसार अंतिम वेतनाच्या आधारे अदा करण्यात यावे. शिक्षक पदभरतीप्रमाणेच अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेत्तर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांतील प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर यांना रजा रोखीकरणाचे लाभ पूर्ववत सुरू करण्यात यावेत. सन १९८८-८९ पासून नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांमध्ये सरळ सेवेने मुख्य लिपिक व वरिष्ठ लिपिक पदांवर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत. न्यायप्रविष्ट नसलेल्या महाविद्यालयीन प्रयोगशाळा सहाय्यकांची शासन निर्णय दिनांक २२/०९/२०२५ नुसार सहावा व सातवा वेतन आयोग लागू करून ग्रेड पे रु. २४०० प्रमाणे वेतन निश्चिती करण्यात यावी. विद्यापीठाती ल नियमित शिक्षकेत्तर पदभरतीच्या अनुषंगाने सध्या असलेला मनुष्यबळाचा अभाव व सन २०१३ पासूनची भरती बंदी विचारात घेऊन पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० ऐवजी ८०:२० करण्यात यावे व ८० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यास मान्यता देण्यात यावी. थकीत डी.सी.पी.एस. वर्गणी कपात बंद करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२३ पासून एन.पी.एस. योजना अस्तित्वात आल्याने बंद करण्यात आलेली डी.सी.पी.एस. वर्गणी कपात पूर्ववत सुरू करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.